**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडल कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. २३/२०१३ दि. २१.०६.२०१३**

| | | |
|---|---|---|
| **नितीष साबा सालकर<br>घर नं ५०४, अलगाचे टेंब<br>मु.पो. पिकुळे<br>ता. दोडामार्ग जि.सिंधुदुर्ग** | } | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| **कार्यकारी अभियंता, महावितरण,<br>विभागीय कार्यालय ,कुडाळ** | } | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | } | **१) श्री. डी. एस्. जामखेडकर, अध्यक्ष<br>२) श्री. व्ही.बी.जगताप ,<br>सचिव तथा कार्यकारी अभियंता<br>३) श्री.एन्.ए.कुलकर्णी , सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | } | **अनुपस्थित** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | } | **अनुपस्थित** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

---

श्री. नितीष साबा सालकर घर नं. ५०४, अलगाचे टेंब मु.पो. पिकुळे,ता. दोडामार्ग,जि. सिंधुदुर्ग यानी त्यांचे रहाते घरी राजीव गांधी ग्रामीण विदयूतीकरण योजनेअंतर्गत वीज कनेक्शन मिळण्यासाठी अर्ज केला होता पण सर्व अटींची पूर्तता करुन देखील विहीत वेळेत कनेक्शन देणेत आले नाही ते ताबडतोब देण्यात यावे अशा आशयाची तक्रार उपरोक्त अर्जदार यानी फॉर्म 'अ'मध्ये मंचाकडे दि. २१.०६.२०१३ रोजी दाखल केलेली आहे. तक्रार प्राप्त होताच मंचाकडील पत्र क्रं. १३६ दि. २५.०६.२०१३ अन्वये कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय कुडाळ यांचे कडे स्पष्टीकरण मागविणेत आले. महावितरणने त्यांचे कडील पत्र क्रं. ४२८० दि. १६.०७.२०१३ अन्वये आपले स्पष्टीकरण सादर केलेले आहे. आयोगाच्या नियमावलीनुसार उभय पक्षांना नोटीस काढण्यात येऊन दि. ०६.०८.२०१३ रोजी सदर प्रकरणाची सुनावणी घेण्यात आली.

अर्जदार श्री. नितीश साबा सालकर यांच्या तक्रारीचे स्वरुप असे की, वर नमूद केलेल्या पत्यावर त्यांचे घर असून राजीव गांधी ग्रामीण विदयुतीकरण योजनेअंतर्गत त्यांचे घरासाठी वीज कनेक्शन मिळणेसाठी त्यानी दि. २०.१०.२०१२ रोजी अर्ज केला असून त्याच दिवशी अदा करणेत आलेल्या कोटेशन प्रमाणे रक्कमेचा भरणा केलेला आहे. इतर सर्व अटींची पूर्तता पण त्याच दिवशी केलेली आहे. पण त्यानंतर मात्र वेळोवेळी पाठपुरावा करुन देखील आज तागायत वीज कनेक्शन मिळालेले नाही. दरम्यान च्या काळात श्री. कोकणे कनिष्ठ अभियंता शाखा कार्यालय भेडशी यांनी, हया योजनेअंतर्गत कनेक्शन देतो पण बाकी सर्व खर्च करावा लागेल असे सांगितले. वास्तविक या योजनेअंतर्गत सर्व सुविधा महावितरणकडून पुरविण्यात येऊन कनेक्शन दयावयाचे आहे असे असताना कनिष्ठ अभियंता भेडशी यानी इतर खर्च करण्याबाबत सुचविले या बाबीचा अर्थबोध न झाल्यामुळे व वेळेत कनेक्शन न मिळालेमुळे तक्रारदारानी आपली तक्रार मंचाकडे दाखल केलेली आहे.

महावितरणने आपल्या स्पष्टीकरणात नमूद केले आहे की, अर्जदारानी वीज कनेक्शन साठी अर्ज दाखल केल्या नंतर ताबडतोब कोटेशन देण्यात आले व त्यानुसार त्यानी दि. २३.१०.२०१२ रोजी पैसे भरुन सर्व अटींची पूर्तता केलेली आहे त्यानंतर मे.जि.टी.एल्. कंपनीकडे या अर्जदाराच्या घरी वायरींगचे काम करुन कनेक्शन देणेबाबतचे काम देण्यात आले होते, पण मे.जि.टी.एल्. कंपनी कडुन वायरींगचे काम पूर्ण होणेस विलंब लागला त्यामुळे हे कनेक्शन प्रलंबित राहीले आहे. त्यानंतर मात्र वायरींगचे काम पूर्ण करणेत येऊन दि. ०९.०७.२०१३ रोजी श्री. नितीष साबा सालकर यांचे घराचे वीज कनेक्शन जोडून देणेत आले आहे. तसेच या बाबत तक्रारदार श्री. नितीष साबा सालकर यांनी पण आपली कोणतीही तक्रार नसल्याचे कळविले असून तशा आशयाचे त्यानी सादर केलेल्या पत्राची प्रत महावितरणकडून मंचास सादर करण्यात आली आहे.

दि. ०६.०८.२०१३ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस तक्रारदार श्री. सालकर तसेच महावितरणकडून कोणीही उपस्थित राहीले नाही. तथापि महावितरणने हे कनेक्शन दिलेले आहे तसेच तक्रारदाराची पण कोणतीही हरकत नाही त्यामुळे उपलब्ध कागदपत्रानुसार निर्णय देण्याबाबत फोन वरुन विनंती केली तसेच त्या आशयाचे पत्र (पत्र क्रं. ४६७८ दि. ०६.०८.२०१३) पण त्यानी मंचाकडे सादर केलेले आहे. सबब उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे मंचाने खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविलेला आहे.

तक्रारदाराची तक्रार रास्त आहे अर्जदारानी महावितरणच्या नियमानुसार सर्व अटींची पूर्तता दि. २३.१०.२०१२ रोजी केल्यानंतर फक्त सर्व्हिस कनेक्शनचे वीज कनेक्शन,आयोगाच्या कृती मानके विनिमय २००५, परिशिष्ट अ मधील तरतुदीनुसार एका महिन्याच्या आत म्हणजे दि. २३.११.२०१२ पर्यन्त देणे गरजेचे होते पण वेळोवेळी पाठपुरावा करुन देखील दि. २१.०६.२०१३ पर्यंत वीज कनेक्शन दिले गेले नाही व त्यानंतर मंचाकडे तक्रार

दाखल केल्यानंतर मात्र ताबडतोब दि. ०९.०७.२०१३ रोजी सर्व वायरींगचे काम पूर्ण करुन कनेक्शन देण्यात आले.वास्तविक हेच काम महावितरणकडून वेळेत पूर्ण करण्यात आले असते तर तक्रारदाराला आपली तक्रार दाखल करावी लागली नसती. हया संदर्भात महावितरणकडून देणेत आले स्पष्टीकरण जसे की, ठेकेदाराने वायरींगचे काम पूर्ण न केल्यामुळे वेळ लागला हे संयुक्तीक वाटत नाही. तसेच अर्जदारानी आपल्या तक्रारीत नमुद केलेल्या मुद्दयानुसार कनिष्ठ अभियंता श्री. कोकणे यानी सुचविलेला कनेक्शनसाठी कराव्या लागणा-या खर्चाचा मुद्दा महावितरणने गांभीर्याने घेऊन याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी असे मंचास वाटते.सदर प्रकरणात अर्जदाराने आपले कनेक्शन विलंबानी मिळाले बाबत नुकसान भरपाई किंवा इतर अनुषंगिक खर्चाबाबत कोणतीही मागणी केलेली नाही त्यामुळे याबाबत मंचाकडून कोणताही आदेश देणेत येत नाही.

मंचाच्या वरील निष्कर्षानुसार खालीलप्रमाणे आदेश देणेत येत आहे.

## आदेश

**१) ग्राहकाची तक्रार मान्य करण्यात आली आहे तथापि तक्रार प्रकरणातील ग्राहकाची वीज जोडणी दिलेली असल्यामुळे व हया बाबतीत अर्जदाराची कोणतीही तक्रार नसल्यामुळे हे प्रकरण निकाली काढणेत येत आहे.**

**२) तक्रारप्रकरणातील खर्च व अनुषंगिक बाबीबाबत कोणत्याही आदेश नाही.**

**३) या आदेशाविरुध्द ग्राहकास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात दाखल करता येईल.**

**<u>पत्ता :-</u>**

**सचिव,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६/६०८,केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,मुंबई ४०००५१**
**फोन नं. ०२२ - २६५२९६५**

| | | |
|---|---|---|
| **श्री. डी. एस्. जामखेडकर** | **श्री. व्हि.बी.जगताप** | **श्री.एन्.ए.कुलकर्णी** |
| **अध्यक्ष** | **सचिव / कार्यकारी अभियंता** | **सदस्य** |
| **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** | **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** | **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** |

**दिनांक :- १३.०८.२०१३**
**ठिकाण :- रत्नागिरी**